महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९८ /२०२४ दि. ०९/०२/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **ठाणेनगर** वाहतूक उपविभागाचे हद्दीत ठाणे रेल्वे स्टेशन परिसरात गावदेवी मंदिर या ठिकाणी ऑटो रिक्षा चालक, प्रवासी व बसेस यांच्यामुळे सकाळी व सायंकाळी गर्दीच्या वेळी प्रचंड वाहतूक कोंडी होत असते. ऑटो रिक्षा चालक व टीएमटी बसेस गोखले रोड, गावदेवी मंदिराचे कॉर्नरवर रिक्षा थांबवून प्रवासी उतरवित असतात. तसेच प्रवासी रस्ता ओलांडताना वाहतूक संथ होत असते. गावदेवी साईबाबा मार्केट गेट नं. २ व गावदेवी मार्केटचे उत्तर दिशेस अशा दोन्ही अरूंद रोडने ऑटो रिक्षा दोन्ही बाजुनी ये–जा करीत असल्याने सदर मार्केट परिसरात मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होवून पादचारी व नागरिकांना त्रास होतो. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) गावदेवी मैदानाचे मागील बाजूस डॉ. बेडेकर हॉस्पिटल कडून गावदेवी साईबाबा मार्केट गेट नं. २ हनुमान मंदिराजवळ बाहेर पडणाऱ्या रोडवर व्हरायटी दुकानासमोर सर्व प्रकारच्या वाहनांना **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने गावदेवी मार्केटचे उत्तर दिशेस बाहेर पडणाऱ्या रोडने सरळ पंजाब नॅशनल बॅक कडून मुस चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) गोखले रोड कडून गावदेवी साईबाबा मार्केट गेट नं. २ येथून डावे वळण घेवून डॉ. बेडेकर हॉस्पिटल कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **गावदेवी साईबाबा मार्केट गेट नं. २** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने गावदेवी बस स्टॉप येथून पंजाब नॅशनल बॅक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) गावदेवी बस स्टॉप येथून गावदेवी मार्केट कडील उत्तर दिशेकडून बाहेर पडणाऱ्या रोडने डावे वळण घेवून जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **ब्ल्यु शूज दुकानासमोर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने गावदेवी बस स्टॉप कडून सरळ पुढे जावून पंजाब नॅशनल बॅक मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना प्रसिध्द झाल्या तारखेपासुन १५ दिवस प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत आहे. काही हरकत अगर सुचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा कार्यालय, तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, ठाणे, ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर अधिसूचना पुढील आदेश होईपावेतो कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
विभाग नियंत्रण, राज्य परिवहन, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
ठाणे पोलीस पत्रक

**प्रत** :– नगर अभियंता, ठा. म. पा. ठाणे.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी**.
स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग,/पोनि ठाणेनगर वाहतूक उपविभाग.